# युवकांनी उत्साहाने लोकशाहीच्या महाउत्सवात सहभागी व्हावे !

मतदार जागृतीसाठी आयोजित भित्तीपत्रक प्रदर्शनाचे जिल्हाधिकारी कार्यालयात उद्घाटन



**पुणे / प्रतिनिधी**

अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदार जागृतीचा संदेश देण्यासाठी रेखाटलेल्या भित्तीपत्रक चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते करण्यात आले. युवकांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या महाउत्सवात सहभागी व्हावे आणि इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन यावेळी डॉ. पुलकुंडवार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय व भारतीय कला प्रसारिणी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे, भारतीय कला प्रसारिणीचे पृथ्वीराज पाठक, प्राचार्य राहूल बळवंत उपस्थित होते.

डॉ.पुलकुंडवार म्हणाले, स्वातंत्र्यानंतर देशातील नागरिकांना मताधिकार मिळाल्याने मतदानाचा दिवस हा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाला लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होता यावे व पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. मतदानावेळी दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना घरातून मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. नागरिकांनीदेखील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस म्हणून साजरा न करता लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा करावा. समाजामध्ये बदल घडविण्याची ताकद तरुण पिढीमध्ये असून नवमतदारांनी प्रत्येक निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजवावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.पुलकुंडवार यांनी कलेच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकाला मतदानाचे आवाहन करणारे संदेश दिल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांच्या मनात निश्चितपणे मतदान करण्याची भावना निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. दिवसे म्हणाले, कला हे प्रभावी माध्यम असल्याने कलेच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत प्रभावीपणे संदेश पोहोचविता येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तयार केलेली भित्तीपत्रके मतदारजागृतीसाठी उपयुक्त ठरतील. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या चित्रांतून मतदानाचा संदेश अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचेल. अन्य माध्यमांचा उपयोग करून ही कलाकृती विविध शासकीय कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सजग नागरिक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमात सहभागी व्हावे, असे सांगून प्रत्येक पात्र मतदाराने येत्या १३ मे रोजी मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन डॉ. दिवसे यांनी केले. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासनाकडून स्वीप उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे यांनी मतदान जनजागृतीसाठी स्वीप मार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच भारतीय कला प्रसारणीचे श्री. पाठक यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी तसेच विद्यार्थी- विद्यार्थीनी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भित्तीपत्रके तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

## थोडक्यात

### प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून तरुणाचा खून

**चिंचवड :** प्रेम संबंधाच्या संशयातून तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत चौघांनी मिळून एका तरुणाचा खून केला आहे. चिंचवड येथे घडली. सुरेश लोडबा ढेंबरे (वय २१, रा. चिंचवड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पिंपरी पोलीस ठाण्यात ३५ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. त्यानुसार संतोष चौघुले (वय २५, रा. चिंचवड), दोन महिला आणि संतोष याचा एक मित्र यांच्या विरोधात गुन्हा दाखल(झळाळि) करण्यात आला आहे. संतोष याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत सुरेश ठोंबरे फिर्यादी यांचा दीर आहे. त्याचे आरोपी महिलेच्या मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याचा आरोपींना संशय होता. त्या कारणावरून आरोपींनी सुरेश याला लाथाबुक्क्यांनी व कमरेच्या बेल्टने बेदम मारहाण केली. त्यात सुरेश गंभीर जखमी झाल्याने त्यातच त्याचा मृत्यू झाला. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत.

### पिस्तूल व जिवंत काडतुसासह तरुणाला अटक

**वाकड :** पिस्तूल व जिवंत काडतुसासह एका २० वर्षीय तरुणाला अटक केली आहे. ही कारवाई थेरगाव येथे वाकड पोलिसांनी केली आहे.

बॉन्ड उर्फ रोहित राहूल शिंदे (वय २० रा. रहाटणी) असे अटक आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई अजय फल्ले यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा त्याच्याकडे अवैधरित्या २५ हजार रुपयांचे पिस्तूल व २ हजार रुपयांचे जिवंत काडतुस असा एकूण २७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

## जिल्ह्यातील सर्वात कमी मतदार असलेल्या दुर्गम मतदान केंद्र परिसरात मतदान माहिती चिठ्ठीचे वाटप

**पुणे / प्रतिनिधी**

भोरचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेंद्र कचरे यांनी जिल्ह्यात भोर तालुक्यातील सर्वात कमी मतदार संख्या असलेले दुर्गम मतदान केंद्र बुरुडमाळ परिसराला भेट देवून येथील सर्व मतदारांना मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप केले तसेच त्यांना मतदान प्रक्रीयेची आणि मतदान केंद्रातील सुविधांची माहिती दिली.

भाटघर धरणाच्या बॅकवॉटर परिसरातील बुरुडमाळ हे मतदान केंद्र अतिशय दुर्गम भागात असून हा परिसर डोंगरांनी व्यापलेला आहे. या मतदान केंद्रावर २१ पुरुष आणि २० महिला असे एकूण ४१ मतदार आहेत. श्री. कचरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व मतदारांना मतदार माहिती चिठ्ठीचे आज वाटप केले. या मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मतदान केंद्र उभारण्यात येणार आहे.

बुरुडमाळ येथील ८९ वयाचे बाबूराव आखाडे हे १९६० पासून प्रत्येक निवडणुकीत न चुकता मतदार केंद्रावर जाऊन मतदान करतात. श्री.कचरे यांनी त्यांची भेट घेतली आणि त्यांनाही प्रत्येक निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीतदेखील मतदान करण्याचे आवाहन केले. आखाडे यांनीदेखील आपण मतदान केंद्रावर येवून मतदान करणार असल्याचे सांगितले.

श्री.आखाडे यांचा आदर्श समोर ठेवून नवमतदारांनी आपले पहिले मतदान करावे आणि लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.कचरे यांनी केले आहे.

## राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेचे शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी येथे आयोजन

**पुणे :** भारतीय शालेय खेळ महासंघ, क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्याद्वारे २३ ते २८ एप्रिल या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी येथे ६७ व्या राष्ट्रीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धा २०२३-२४ चे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन २३ एप्रिल रोजी सायं ५.३० वाजता संकुलातील वॉर्मअप ट्रॅकवर क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी क्रीडा व युवक सेवा सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक संजय सबनीस, सुहास पाटील, महाराष्ट्र रग्बी फुटबॉल असोसिएशनच्या अध्यक्षा मीनल पटसाला, सचिव नासिर हुसेन आदी उपस्थित राहणार आहेत.

२३ व २४ एप्रिल रोजी १९ वर्षाखालील मुले व मुली तर २७ व २८ एप्रिल रोजी १७ वर्षाखालील मुले व मुली गटाच्या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेत आंध्रप्रदेश, तेलंगणा, ओडिशा, छत्तीसगढ, गुजरात, बिहार, तामीळनाडू, राजस्थान, दिल्ली, जम्मू काश्मिर, मध्यप्रदेश, महाराष्ट्र या राज्यांसह विद्याभारती, आयपीएससी, सिबीएसई अशा १५ संघांचे ७०० खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, संघव्यवस्थापक, तांत्रिक अधिकारी सहभागी होण्यासाठी क्रीडानगरीत दाखल झालेले आहेत.

राष्ट्रीय पातळीवरील रग्बीच्या शालेय स्पर्धा प्रथमच पुणे शहरात होत असून स्पर्धेस संपूर्ण तांत्रिक सहकार्य इंडियन रग्बी फुटबॉल युनियन यांनी दिलेले आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या संघामधून एशिया रग्बी चॅम्पियनशिप स्पर्धेतील रजतपदक विजेते यश जाधव व नम्रता पाटील हे आंतरराष्ट्रीय खेळाडू हे प्रतिनिधित्व करतील. बिहार राज्याकडून आंतरराष्ट्रीय खेळाडू गुरिया कुमारी व अंशु कुमारी, दिल्लीकडून राष्ट्रीय खेळाडू शहबाज अन्सारी तसेच तामीळनाडूकडून राष्ट्रीय खेळाडू आकाश कुमार हे स्पर्धेमध्ये सहभागी होतील.

## लोखंडी रॉडने झालेल्या मारहाणीत एकजण गंभीर जखमी



**मावळ / प्रतिनिधी**

लोखंडी रॉडने झालेल्या मारहाणीत एकजण गंभीर जखमी झाला. ही घटना सायंकाळी साडेचार वाजता मावळ तालुक्यातील उर्से येथे घडली.

गोपीनाथ बाळासाहेब लिमण (वय ४८, रा. सांगवडे, ता. मावळ) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अनिकेत गोपीनाथ लिमण (वय २०) यांनी शिरगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ३१ वर्षीय महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे वडील गोपीनाथ हे उर्से येथे खोल्यांची देखभाल करत असताना त्यांनी एका महिलेचा दरवाजा वाजवल्याच्या कारणावरून त्यांचा वाद झाला. त्या कारणावरून आरोपी महिलेने गोपीनाथ यांना लोखंडी रॉडने डोक्यात, हातावर मारून त्यांना गंभीर जखमी केले. शिरगाव पोलीस तपास करीत आहेत.

## बिबट्याच्या हल्ल्यात १ शेळी ठार,दोन करडे पळवली



**शिक्रापूर / प्रतिनिधी**

केळगाव येथील हनुमानवाडीतील ठाकर वस्ती पासून जवळ असणाऱ्या एका शेतात नागेश सतीश कोकरे (धनकर) यांचे कुटूंब शेळ्या, मेंढ्या (मेंढपाळाचा वाडा)गेल्या काही दिवसांपासून वसलेले आहे.आज दि.२२ रोजी पहाटे बिबट्याने त्याठिकाणी एका शेळीवर हल्ला केला असून शेळीची २ पिल्ले (करडे)घेऊन तो पसार झाला आहे.

त्याच्या या हल्ल्यात १शेळी ठार झाली आहे.बिबट्या ने त्या शेळीस फरफटत जवळील ओढ्यात नेऊन तिला मारून टाकले आहे.ती शेळी गरोदर असल्याचे यावेळी कोकरे कुटुंबाने यावेळी सांगितले. तसेच दोन करडे( शेळीचे पिल्ले) पळवली आहेत . व तेथील एक कुत्रा नाहीसा झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

तसेच वनविभाग कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन माहिती घेतली आहे.व तिथे बिबट्याचे पंजाचे ठस्से वनविभाग कर्मचाऱ्यास आढळून आले आहेत.असे ही यावेळी कोकरे (धनकर ) कुटुंबाने सांगितले. राज्यातील सर्व पशूंची ईअर टॅगिंग शरी रिंससळपस करून त्याची नोंद अंतर्गत भारत पशुधन प्रणालीवर घेणे बंधनकारक करणे बाबत..महाराष्ट्र शासन , कृषी पशुसंवर्धन , दुग्ध व्यवसाय विभाग,शासन निर्णय (जीआर) आलेला आहे. त्यामध्ये नैसर्गिक आपत्ती,विजेचा धक्का तसेच वन्य पशूंच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास ईअर टॅगिंग केलेली नसल्यास नुकसान भरपाईची रक्कम देय होणार नाही. असे नमूद केले आहे. या जीआर विषयी वनरक्षक यांनी कोकरे कुटुंबाला यावेळी माहिती दिली.

सर्व पशूंची ईअर टॅगिंग (कानावर बिल्ला असणे)या नवीन शासन निर्णय बाबत काहीही माहिती नसल्याचे यावेळी कोकरे कुटुंबाने सांगितले.एक गरोदर शेळी बिबट्याने ठार केली असून दोन करडे ही नेली.यामुळे मोठे नुकसान झाले असून त्याची भरपाई शासनाकडून मिळावी .अशी मागणी यावेळी त्यांनी केली. भरपाई मिळावी म्हणून संबंधित वनविभाग व इतर विभाग याकडे अर्ज करणार आहोत असे कोकरे कुटुंबाने यावेळी सांगितले आहे. जिल्हा परिषद पुणे ,पंचायत समिती खेड पशुसंवर्धन विभाग (स्थानिकस्तर) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १/ आळंदी येथील पशुधन विकास अधिकारी यांनी यावेळी सांगितले की ,ज्यांची पशूंची ईअर टॅगिंग राहिलेली असेल त्यांनी आपल्या आपल्या विभागात( रहिवासी असेलल्या संबंधित विभागात) करून घ्यावी.

## क्रोमा मॉल - वाकड मतदार जनजागृती अभियान

**चिंचवड / प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये मतदार जनजागृतीसाठी आणि मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मा.निवडणूक निर्णय अधिकारी श्री.दिपक सींगला, ३३ मावळ लोकसभा मतदारसंघ आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्री.विठ्ठल जोशी, २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघ यांचे मार्गदर्शनाखाली क्रोमा मॉल, वाकड येथे मतदार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी क्रोमा मॉलचे एडीम मंदार मांढरे, क्रोमा शाखेतील स्टाफ व २०५ चिंचवड विधानसभा मतदार स्वीप टिमचे नोडल अधिकारी श्री राजाराम सरगर व स्वीप व्यवस्थापन टीम यावेळी येथे उपस्थित होते. मा. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये या भागातील मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. तसेच संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती करण्यात आली. यामध्ये मॉलमधील कर्मचा-यांना मतदान करण्यासाठी एक उत्साह मिळाला तसेच देशहितासाठी मतदान करा, आपले अमूल्य मत, करेल लोकशाही मजबूत असा संदेश देण्यात आला. यानंतर कर्मचा-यांकडून मतदान प्रतिज्ञा म्हणून घेणेत आली.

## शस्त्राने वार करून चालकाला लुटणाऱ्या आरोपीला अटक



**निगडी / प्रतिनिधी**

शस्त्राने वार करून एका चालकाला लुटण्यात आले आहे. ही घटना निगडी येथील भक्ती-शक्ती ब्रिज खाली घडली आहे. याप्रकरणी निगडी पोलिसांनी एकाला अठक केली आहे.

शब्बीर अत्तर सय्यद (वय २७ रा. ओटास्कीम, निगडी) असे अटक आरोपीचे नाव आहे. तर त्याच्या आणखी एका साथीदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी रमेश बबन सुळे (वय ३९ रा.तळवडे) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलल्या माहितीनुसार, फिर्यादी हे त्यांचा पार्क केलेला टेम्पो घेण्यासाठी गेले असता तेथे रिक्षामध्ये बसलेले आरोपींनी फिर्यादीला थांबवले व त्यांच्या कडील हत्याराने फिर्यादीच्या डोळ्यावर मारून त्यांना जखमी केले. त्यांच्याकडील मोबाईल व रोख ४ हजार ५०० रुपये असा एकूण १४ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. यावरून निगडी पोलिसांनी एकाला अटक केली असून दुसऱ्याचा पोलीस शोध घेत आहेत.

मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव

**कन्व्हर्टरटेक एनर्जी सोल्यूशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**

कॉर्पोरेट व्यक्ती (ऐच्छिक लिक्विडेशनमध्ये)

**नोंदणीकृत कार्यालय : ऑफिस ६०१, पेंटागॉन, मगरपट्टा सिटी, बिल्डिंग पी २, हडपसर, पुणे ४११०२८, महाराष्ट्र, भारत)**

दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ अंतर्गत ई-लिलावाद्वारे येथे सूचीबद्ध केलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक नोटीस आणि ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे येथे https://ncltauction.auctiontiger.net तयार केलेले नियम:

| | | |
|---|---|---|
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | २३.०५.२०२४ पासून सकाळी १० वाजता ते दुपारी ४.०० वाजता. | |
| बोली फॉर्म सादर करणे, फॉर्म आणि केवायसीची घोषणा | २३.०४.२०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० वा त्यापूर्वी ०७.०५.२०२४ रोजी. | |
| तपासणीची तारीख आणि वेळ | १०.०५.२०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० वा त्यापूर्वी १७.०५.२०२४ रोजी. | |
| ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख | २१.०५.२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत | |
| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रूपये) | ईएमडी रक्कम (रूपये) |
| लॅपटॉप डेल अक्षांश: ७ क्रमांक, प्रिंटर एचपी ऑफिस जेट: १ क्रमांक आणि युबिक्यूटू यू६ एलआर ॲक्सेस पॉइंट, हुवावे : १ नंबर | १,०४,८५०/- | १०,४८५/- |

**ई-लिलावाच्या अटी आणि नियम खालीलप्रमाणे आहेत:**

१. सेवा पुरवठादार, मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लिमिटेडमार्फत (लिलाव करणारा) जेथे आधार आहे, **जसे आहे, तसेच जे काही आहे, तसेच जे काही आहे तसेच आधार नसलेले यावर ई-लिलाव** आयोजित केला जाईल.

२. ही ई-लिलाव विक्री सूचना माहितीसाठी आहे आणि ई-लिलाव प्रक्रिया आणि मालमत्ता माहिती दस्तऐवज ज्यामध्ये ई-लिलाव बोली फॉर्म, घोषणा आणि उपक्रम फॉर्म आणि ई-लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती आहेत त्यांच्या संयोगाने वाचले पाहिजे, जे वेबसाइटवर उपलब्ध आहेत: https://ncltauction.auctiontiger.net लिक्विडेटरच्या संपर्क तपशीलासाठी खाली दिलेले आहे.

३. लिक्विडेटरने उपरोक्त नमूद केलेल्या कोणत्याही वस्तूंच्या ई-लिलावामधून पैसे काढण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. बोली दस्तऐवज सादर करण्याच्या बंद होण्यापूर्वीच्या आधी कोणत्याही वेळी आणि कोणत्याही इच्छुक बोलीदाराला त्याच्या विरुद्ध कोणतेही हक्क किंवा दावे नाहीत. उपरोल्लेखित पैसे काढण्याच्या प्रसंगी लॉट/से किंवा सब-लॉट.

४. ई-लिलावात भाग घेण्यासाठी इच्छुक बोलीदाराने भरला जाणारा बोली फॉर्म ई-लिलावाच्या तपशीलवार अटी आणि शर्ती प्रदान करतो आणि इच्छुक बोलीदाराने बिड फॉर्म काळजीपूर्वक वाचणे आणि भाग घेण्यापूर्वी ईएमडीसह बिड फॉर्म ई-लिलावामध्ये सबमिट करणे अपेक्षित आहे.

**जारी करणारे : संजय अग्रवाल,**
**लिक्विडेटर, कन्व्हर्टरटेक एनर्जी सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,**
**कॉर्पोरेट व्यक्ती ( ऐच्छिक लिक्विडेशनमध्ये) आयबीबीआय नोंदणी क्रमांक:** IBBI/IPA-001/IP-POO466/2017-18/10809 AFA No.AAI/10809/02/300724/105924 dated 31.07.2023. AFA 30.07.2024 **पर्यंत वैध. ए-१००२, आम्रपाली ईडन पार्क, एफ-२७, सेक्टर-५०, नोएडा-२०१३०१**
**संपर्क क्रमांक: +९१ ९८११५७४१०६,**
**नोंदणीकृत ई-मेल आयडी:** sanjayagrawal_sagrawal@yahoo.com
**संपर्कासाठी ई-मेल आयडी:** voliq.convertertec.sa@gmail.com

**दिनांक: २२.०४.२०२४**

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 17.04.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. बोने लक्ष्मण विलासराव 2. बोने सुनीता लक्ष्मण | मालमत्तेचा पत्ता फ्लॅट क्रमांक: 508,संलग्न बाल्कनीसह 25.94 चौरस मीटर चटई क्षेत्र 0.00 चौरस मीटरचे मोजमाप आणि पुढे सोबत जोडलेल्या बाल्कनीसह 5.37 चौरस मीटर आणि पुढे पाचव्या मजल्यावरील खुल्या टेरेसच्या अनन्य हक्कासह, इमारत क्रमांक b1 मध्ये, xrbia Abode म्हणून ओळखले जाते, गाव जांभूळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र भारत410506 (गट क्रमांक 240) | H00535191219103259/H0053519121910325 9L/H00535191219103259G | 19.01.2024 | रु. 1,11,528 | रु . 24,60,441.00 | Rs. 11,15,280 | 07.05.2024 | 13.05.2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **11/05/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **13/05/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **14/05/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या तपासणीसाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की **नाव - शेखर काळे, संपर्क नं.9823271111, ऑफिस LT फायनान्स लिमिटेड, ऑफिस नंबर 301, 3रा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, सक्कर संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005.आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, LT फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, CST रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकारू/नाकारू शकतो/सुधारू शकतो/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 23.04.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com